E-416448

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

### // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रफळ एकुण 79.40 चौ.कि.मी असुन सन 2011 ची लोकसंख्या 8,14,655 इतकी आहे. सद्यस्थितीमध्ये शहराची अंदाजीत लोकसंख्या 12,64,000 इतकी आहे. घनकचरा संकलन व साफसफाई करीता एकुण 24 वॉर्डची दोन झोनमध्ये विभागणी करुन एकुण 1805 कंत्राटी कामगार एकुण 157 वाहनाद्वारे दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा प्रकल्प ठिकाणी वाहतुक करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन अंदाजे 450 ते 500 मेट्रीक टन घनकचरा निर्माण होत आहे. मौजे उत्तन येथे सद्यस्थीत अंदाजे 225 - 250 TPD ओला कचऱ्यावर कंपोस्टींग व अंदाजे 150 - 175 TPD कचऱ्यापासुन RDF तयार करण्यात येत आहे. 50 टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस निर्मिती करण्यात येते.

महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक उत्पादक, वापर करणारे, विक्री करणारे, हाताळणी व साठवणुक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे, उघड्यावर शौच करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, घनकचरा जाळणे, गॅरेज व स्वीट मार्टवर अस्वच्छता, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी व्यक्तींकडून विशेष दंड वसुल करणे इत्यादी कार्यवाही स्वच्छता अधिकारी/ स्वच्छता निरीक्षक/ प्र. स्वच्छता निरिक्षक व त्यांचे अधिनस्त जवळपास 100 मुकादम यांच्यामार्फत करण्यात येत आहे. दि. 1 एप्रिल, 2024 ते आजमित्तीस घनकचरा विषयक बाबींचे उल्लंघन करणाऱ्यांवर रु. 79,92,352/- दंड वसुल करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तसेच मुंबईतुन येणाऱ्या अज्ञात वाहनाद्वारे मोठ्याप्रमाणात माती व डेब्रीज तसेच नागरीकांमार्फत इमारत, फ्लॅट, दुकान दुरुस्ती कामातून निघालेली रॅबिट, टाकाऊ साहित्य वस्तु मोकळया जागेत, सार्वजनिक रस्ते, चौक या ठिकाणी भरलेली वाहने जर मार्गदर्शन सुचनांचे पालन करीत नसल्यास त्यांना थांबवून अशा वाहनावर कार्यवाही करणे कामी महापालिका क्षेत्रात 04 ठिकाणी गस्ती पथक व भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे व या पथकांमार्फत अद्यापपर्यंत 426 वाहनांची तपासणी करण्यात आली असुन या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर 10 गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व रु. 40,000/- दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. अशारितीने घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये घनकचऱ्याचे संकलन, वाहतुक व प्रक्रिया करण्यात येते.

शहराचा AQI चांगला रहावा याकरीता नियमितपणे Deep Clean Drive घेण्यात येत आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्या शहरातील 2 RMC प्लांट बंद करण्यात आलेले आहेत. तसेच बांधकाम व्यावसायीक, सार्वजनिक विकासाची कामे करणारे कंत्राटदार यांना हवा प्रदुषण होऊ नये याकरीता मार्गदर्शक तत्वे घालुन देण्यात आलेली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही न करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Nirbhay Patil\Public Health\Swachha Bharat Abhiyan\Press Note\Press Note Air Pollution.docx